## भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई
## स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड
## सांस्कृतिक विभाग
## वार्षिक अहवाल 2022-23

### 1. आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रम

दिनांक 23 ऑगस्ट,2022 रोजी आजादी का अमृत महोत्सव यानिमित्ताने महाविद्यालयात देशभक्तीपर गीत गायन आणि नृत्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात विद्यार्थ्यांनी देश रंगीला रंगीला, सुनो गोरसे दुनियावालो, हम इंडिया वाले, वो देश मेरे या गीतांवर नृत्य सादर केले तसेच देशभक्तीपर गीतांचे गायन केले







## 2. पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविणे कार्यशाळा

शहरपातळीवर गणेशचतुर्थी अगोदर दोन दिवस भूगोल विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविणे कार्यशाळा घेण्यात आली . या कार्यशाळेत महाविद्यालयातील,शहरातील विविध शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला . डॉ. जोगेंद्र गायकवाड यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन करून गणेश मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण दिले .










### 3. 75 भित्तिपत्रकांचे प्रकाशन

सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक 15 ऑगस्ट, 2023 रोजी स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव या निमित्ताने 75 विद्यार्थ्यांना 75 वेगवेगळे सशस्त्र क्रांतिकारक अभ्यासासाठी देण्यात आले होते आणि नंतर त्यावर भित्तिपत्रक बनवण्यात आले. अशा 75 भितीपत्रकांचे प्रकाशन केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्रीमान सर्वज्ञ सरांच्या हस्ते झाले





### 4. केंद्रीय युवक महोत्सव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद द्वारा आयोजित केंद्रीय युवक महोत्सव 2022-23 मध्ये महाविद्यालयाचा41 जणांचा संघ सहभागी झाला होता. यात महाविद्यालयाने16 कला प्रकारात सहभाग नोंदविला. महाविद्यालयाने भजन सांघिक कलाप्रकार तृतीय पुरस्का,रकाव्यवाचन वैयक्तिक कलाप्रकार प्रथम पुरस्कार पटकावला विद्यार्थ्यांनी भजन, काव्य वाचन, वक्तृत्व, वादविवाद, लोकनाट्य, कव्वाली, लोकगीत, रांगोळी, भारूड, लोकनृत्य या कलाप्रकारात नैपुण्य दाखवले .









डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
युवा महोत्सव – २०२२
स्टेज क्र. ४ नादरंग
शास्त्रीय तालवाद्य | शास्त्रीय गायन
शास्त्रीय सुरवाद्य | सुगम गायन भारतीय


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
युवा महोत्सव – २०२२
स्टेज क्र. ४ नादरंग
शास्त्रीय तालवाद्य | शास्त्रीय गायन
शास्त्रीय सुरवाद्य | गायन भारतीय

5. रांगोळी स्पर्धा

मिलिया महाविद्यालय बीड येथील महिला कक्ष आणि गृह विज्ञान विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धेत महाविद्यालयातील सहा विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवलायात कु. वैभवी गरुड बी.एससी. प्रथम वर्ष हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर महाविद्यालयाच्याच विद्यार्थिनी कुमृदुला बालवडकर आणि कु धनवी पाटील बीएससी. प्रथम वर्ष यांनी विभागून द्वितीय क्रमांक पटकावला

















### 6.गणेशोत्सव 2022-23

महाविद्यालयातील कार्यालय विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यालयात गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली आणि दररोज आरती करण्यात आली. या अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते यात रांगोळी स्पर्धा ,कॅरम स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा , उस्फूर्त भाषण , काव्यवाचन स्पर्धा , गीत गायन स्पर्धा व एकपात्री अभिनय अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी गणेशोत्सवासाठी ढोल पथक आणि लेझीम पथकाचा सराव घेण्यात आला आणि या पथकांसह गणेश विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली . यात महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले गणेशोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी डॉप्रशांत तालखेडकर अभय पांडव व सर्व सहकारी, प्रशासकीय कर्मचारी, सेवक परिचर तसेच सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य, क्रीडा विभाग प्रमुख छत्रपती बांगरकर यांनी पार पाडली










7. निबंध स्पर्धा

सावरकर-धगधगते यज्ञकुंड या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली . यात खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिक मिळवले.कु . अपर्णा शांतिलिंग स्वामी बी. ए. तृतीय वर्ष -प्रथम क्रमांक ,कु . वैष्णवी नारायण राऊत बी. ए. द्वितीय वर्ष-द्वितीय क्रमांककु. अश्विनी अनिल जोशी बी. एस्सी.प्रथम वर्ष- तृतीय क्रमांक

8.भजन स्पर्धा

आमदार राम शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जामखेड येथे आयोजित भव्य भजन स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या दोन संघांनी सहभाग नोंदवला यात विठूचा गजर आणि घेई घेई माझे वाचे हे दोन भजन सादर करण्यात आले






9.सुगम नाट्यगीत गायन स्पर्धा2022

महाविद्यालयाचा बी.ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी लक्ष्मीप्रसाद पटवारी याला  रसिक मंडळ माजलगाव द्वारा १०-११ डिसेंबर, २०२२ रोजी आयोजित सुगम नाट्यगीत गायन स्पर्धा2022 मध्ये मोठ्या गटात सर्व द्वितीय क्रमांक मिळाला. त्याला कै. रामराव केशवराव वैद्य पुरस्कार रुपये2001 व स्मृतिचिन्ह ,तसेच कै.अनंतराव भिलेगावकर पुरस्कार रुपये 1001 देऊन गौरविण्यात आले



10. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरस्थळी भजन

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरस्थळी मौजे शिदोड येथे महालक्ष्मी मंदिरात सायंकाळी भजनाचे आयोजन केले होते . यात महाविद्यालयाचे विद्यार्थी गणेश बाब,रसुग्रीवजी डाके, आकाश गवते  यांनी अभंग सादर केले.






.

1.जिजाऊ जन्मोत्सव2023

मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी प्रांजल भोकरेमृदुला वालवडकर यांनी रांगोळी स्पर्धेत सहभाग नोंदवला तसेच नेहा पवार, मृदुला वालवडकर यांनी मेहंदी स्पर्धेत सहभाग नोंदवला





12. सावरकर महोत्सव2023

सावरकर महोत्सवांतर्गत फॅन्सी ड्रेस स्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा, संगीत रजनी, एक मिनिट स्पर्धा, डिश सजावट स्पर्धा घेण्यात आल्या, संगीत रजनी मध्ये वीस गीतांचे गायन करण्यात आले . यात भजन , भावगीत, अभंग, गझल इत्यादी काव्यप्रकारांचा सहभाग होता. तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमात एकूण वीस नृत्य सादर करण्यात आली . फॅन्सी ड्रेस कला प्रकारात 25 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सावरकर महोत्सवातील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले






13.शिवजन्मोत्सव2023

शिवजयंती निमित्त शिवजन्मोत्सव2023 ही जिल्हास्तरीय वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली यात शिवाजी महाराजांच्या जीवनाशी संबंधित महिला किंवा पुरुष व्यक्तीची वेशभूषा संवादासह सादर करायची होती. यात जिल्ह्यातील विविध शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला . या स्पर्धेसाठी प्राथमिक गट , माध्यमिक गट आणि महाविद्यालयीन गट असे तीन गट करण्यात आले होते.प्रत्येक गटातून

प्रथम पुरस्कार रुपये1000 , स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र

द्वितीय पुरस्कार500 रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र

तृतीय पुरस्कार 250 रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र
उत्तेजनार्थ पुरस्कार प्रमाणपत्र
अशी पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेत एकूण 41 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयीन गटातून चि. वीर आदित्य सूर्यकांत- प्रथम क्रमांक
चि. पियुष अजय सवाई- द्वितीय क्रमांक
कु. अंजली जालिंदर शिंदे तृतीय क्रमांक












14.कल्पतरू महोत्सव 2023

कल्पतरू महोत्सव 2023 या वैयक्तिक नृत्य स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनींनी वैयक्तिक नृत्य सादर केले यात कु. सोनल वाघमारे बी.एस्सी. प्रथम वर्ष- हसता हुआ नूरानी चेहरा, कु. मृदुला वालवडकर बी.एससी. प्रथम वर्ष- सामी, कु. सलोनी शर्मा बीकॉम. प्रथम वर्ष- लेहेंगा अशी तीन वैयक्तिक नृत्य सादर झाली






15. नेहरू युवा महोत्सव2023

नेहरू युवा महोत्सव2023 मध्ये महाविद्यालयातील27 विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता.यात महाविद्यालयाने चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा , फोटोग्राफी , काव्य लेखन आणि समूह नृत्य या कलाप्रकारांमध्ये सहभाग घेतला , महाविद्यालयालाकाव्यलेखन,द्वितीय क्रमांक रु 3000, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह-कु. अपर्णा रामलिंग स्वामी बीए. तृतीय वर्ष वक्तृत्व स्पर्धा,तृतीय क्रमांक रु.2000, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह-चि.लक्ष्मीप्रसाद शंकरराव पटवारी बी.ए.प्रथम वर्ष समूहनृत्य- सुया घे पोत घे -तृतीय क्रमांक रु . 2000, प्रमाणपत्र,स्मृतिचिन्ह-याप्रमाणे बक्षीसे प्राप्त झाली .






डॉ.  रुपाली ब. कुलकर्णी
सांस्कृतिक विभाग प्रमुख